**उपरोक्त नमुद सर्व बाबींचा विचार करुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र . 1,2,3,4,5 व 6 अंतर्गत येणाऱ्या उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरिता दि. 18/06/2005 व दि . 11/08/2011 रोजी हायड्रोलिक शिडीसह वाहन ख रेदी करण्यात आलेली होती . सदरचे वाहन अनुक्रमे 13 वर्षे (बंद) व 07 वर्षे जुने झालेले असून वाहन वारंवार नादुरुस्त होत आहे. तसेच एका हायड्रोलिक शिडीच्यासहायाने छाटणी करण्यास खुप कालावधी लागत असल्याने मा. वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये व स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चेनुसार मा. उप-आयुक्त यांच्या पत्रान्वये मे . शालिमार इंजिनियरींग कंपनी यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा./539/2017-18 दि. 18/01/2018 रोजी व M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. यांना जा .क्र.मनपा/वृ.प्रा./550/2017-18, दि. 20/01/2018 अन्वये सदर उत्पा दक कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात आली असता खालील प्रमाणे हायड्रोलिक शिडीसह वाहन खरेदी करणेकामी M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. यांचे अधिकृत विक्रेते M/s. Wasan Trucking Pvt. Ltd. यांचे दि. 16/02/2018 व मे. शालिमार इंजिनियरींग कंपनी यांचे दि . 20/02/2018 अन्वये शासकीय दरपत्रक प्राप्त झालेले आहेत . Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. (M/s. Wasan Trucking Pvt. Ltd.) व Shalimar Engineering Company या अनुक्रमे वाहन व Mac-lifton Hydraulic Aerial Lift System उत्पादक कंपन्या आहेत.**

**A) Bharat Benz Vehicle**

| | Description | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|
| 1) | Model :- 1014R 4x2 3760 (17 Feet) E4 DYC CHS (Cabin Chassis) NT MD AW with PTO | 1 | 10,17,406 | 10,17,406 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | CGST @ 14% | | 1,42,437 | 1,42,437 |
| | SGST @ 14% | | 1,42,437 | 1,42,437 |
| | Insurance | | 50,000 | 50,000 |
| | RTO | | 30,000 | 30,000 |
| | TCS @ 1% | | 13,022 | 13,022 |
| | Net Amount Receivable | | | 13,95,302 |

**Bharat Benz Vehicle**

| | Description | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|
| 2) | Model :- 1014R 4x2 4250 (19 Feet) E4 DYC CHS (Cabin Chassis) NT MD AW with PTO | 1 | 10,23,161 | 10,23,161 |
| | CGST @ 14% | | 1,43,242.5 | 1,43,242.5 |
| | SGST @ 14% | | 1,43,242.5 | 1,43,242.5 |
| | Insurance | | 50,000 | 50,000 |
| | RTO | | 30,000 | 30,000 |
| | TCS @ 1% | | 13,096 | 13,096 |
| | Net Amount Receivable | | | 14,02,742 |

**B) SHALIMAR ENGINEERING COMPANY**

**MAC-LIFTON 13M 3B HYDRAULIC ARIEL LIFT**

| | Description | | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1) | Model | Maclifton 13M 3B | 1 | 18,12,444 | 18,12,444 |
| | Capacity | 225 kgs | | | |
| | Max. Working Height | 13 mtr From Ground Level | | | |
| | Max. Platform Height | 11.5 mtrs from ground level | | | |
| | Max. Outreach | 6.0 mtr | | | |
| | Overall Height | 3.5 mtr (Subject to truck model) | | | |
| | Overall Length | 7.3 mtr approx. (Subject to truck model) | | | |
| | Basket Size | 0.6 x 1.0 x 1.0 M | | | |
| | Working Pressure | 2200 PSI | | | |
| | Suitable Vehicle | 9 ton GVW. Wheel Base 3760 mm Fitted with PTO and PTO operating kit complete Preferably with power steering. | | | |
| | GST @ 18% | | | 3,26,240 | 3,26,240 |
| | Net Amount Receivable | | | | 21,38,684/- |

**MAC-LIFTON 14.5M 3B HYDRAULIC ARIEL LIFT**

| | Description | | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 2) | Model | Maclifton 14.5M 3B | 1 | 19,75,444 | 19,75,444 |
| | Capacity | 225 kgs | | | |
| | Max. Working Height | 14.5 mtr From Ground Level | | | |
| | Max. Platform Height | 13.0 mtrs from ground level | | | |
| | Max. Outreach | 6.5 mtr | | | |
| | Overall Height | 3.5 mtr (Subject to truck model) | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Overall Length | 7.3 mtr approx. (Subject to truck model) | | | |
| | Basket Size | 0.6 x 1.0 x 1.0 M | | | |
| | Working Pressure | 2200 PSI | | | |
| | Suitable Vehicle | Bharat Benz 914. Wheel Base 4200 mm Fitted with PTO and PTO operating kit complete Preferably with power steering. | | | |
| | GST @ 18% | | | 3,55,580 | 3,55,580 |
| | Net Amount Receivable | | | | 23,31,024/- |

**उपरोक्त प्रमाणे M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. (M/s. Wasan Trucking Pvt. Ltd.) या उत्पादक कंपनीकडून 02 वाहने (Bharat Benz Vehicle) खरेदी करणेकामी रु. 27,98,044/- (रु. सत्तावीस लाख अठ्याण्णव हजार चव्वेचाळीस मात्र) व M/s. Shalimar Engineering यांच्याकडून 02 वाहनांवर Maclifton Hydraulic Aerial Lift System बसविणेकामी रु. 44,69,708/- (रु. चव्वेचाळीस लाख एकोणसत्तर हजार सातशे आठ मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.**

**सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरिता "वाहन खरेदी / भाडे" या लेखाशिर्षाखाली रु. 100.00/- लाख (रु. एक कोटी मात्र) ची तरतुद करण्यात आलेली आहे. आप्तकालीन व्यवस्थापन तसेच मान्सूनपूर्व धोकादायक फांदयांची छाटणी करणेच्या अनुषंगाने वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.**

**उपरोक्त प्रमाणे M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. (M/s. Wasan Trucking Pvt. Ltd.) या उत्पादक कंपनीकडून 02 वाहने (Bharat Benz Vehicle) व दोन्ही वाहनांवर M/s. Shalimar Engineering या उत्पादक कंपनीकडून Maclifton Aerial Lift System बसविणेकामी येणाऱ्या एकूण रु. 72,67,752/- (रु. बहात्तर लाख सदुसष्ट हजार सातशे बावन्न मात्र ) खर्चास तसेच सदरबाबत तातडीने देयक अदा करुन वाहने खरेदी करणेस मा . स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.**

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

हायड्रॉलीक लिफ्टची वॉरंटी किती आहे.

**मा. सभापती :-**

इरकर साहेब तुम्ही फक्त भारत बेंच ह्या कंपनीचे वेहिकल घेणार आहेत त्याच्यामागच कारण सांगा. मॅक लिफ्टन आहे ना ही लोकल मॉडेल आहे. इम्पोर्टेड मॉडल आपण घेतले तर त्याचे काय. हा विषय आपण बजेटच्या मिटींगमध्ये घेतला होता तुम्ही हे लेट का केले. कारण गाड्या बनवायला २-३ महिने लागतील. झाडाच्या फांद्यांची कटींग जूनमध्ये सुरु होईल. आता एप्रिल आहे. तुम्ही टेंडर काढणार, तुम्ही घेणार आणखी वेळ लागेल. तुम्ही अगोदर का नाही केले. २६ एप्रिल एक महिना होऊन गेला.

**जुबेर इनामदार :-**

वॉरन्टी म्हणजे काय कॉम्प्रेहेन्सीव वॉरन्टी घेतली की वॉरन्टी घेतली. कॉम्प्रेहेन्सीव वॉरन्टीचा अर्थ समजतो. काही झाले तरी सामानापासून जे काही लागेल त्याला त्याची जबाबदारी त्याची वर्षभरात किती सर्विस देतात.

**नागेश इरकर :-**

वर्षातून २ वेळा.

**जुबेर इनामदार :-**

त्याचा तुम्ही उल्लेख केला पाहिजे. त्याच्यानंतर ए.एम.सी. चे काय.

**नागेश इरकर :-**

त्याच्यामध्ये पाठवतो. इस्टीमेट दिले त्याप्रमाणे मंजुरी घेतो.

**जुबेर इनामदार :-**

ही वस्तू बिघडणारी वस्तू आहे. हायड्रोलिक लिफ्ट आहे. तांत्रिक विषय काहीतरी कमी जास्त होते. ए.एम.सी. च्या त्या कंपनीकडे चर्चा केली आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो विषय चांगला आहे. ए.एम.सी. आम्ही करणार आहोत. त्यांना बोलवून ए.एम.सी. चे कॉन्ट्रॅक्ट करुन नंतर विषय घेतो.

**मा. सभापती :-**

साहेब हे भारत बेंच ह्याच कंपनीचे व्हेईकल का प्रस्तावित केले आहेत. आणि मॅक लिफ्टन ही लोकल मॉडेल आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो ह्या गाडीचा अनुभव आहे ही गाडी चांगली आहे. इतर महापालिकेमध्ये हाच मॉडेल वापरतात. अनुभव चांगला आहे म्हणून घेतो.

**मा. सभापती :-**

मी काल वेबसाईटवर माहिती घेतली ह्या मॅक लिफ्टनपेक्षा दुसरी कंपनी आहे. तीचा परफॉमन्स चांगला आहे. वॉरन्टी ३ वर्षांची आहे. ह्याची वॉरन्टी १ वर्षाची आहे. प्रत्येक वेळी आपण ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी यूज करतो. मग ह्याच्यात ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी का यूज करत नाही. साहेब आम्ही नगरसेवक अभ्यास करतो. तर आम्हाला आपल्याकडून हीच अपेक्षा आहे की थोडस आणखी अभ्यास करा. साहेब ही भारत बेंच कंपनी आहे ह्याच्यात आयशर मॉडेल आहे. ह्याच्यात अशोक लेलॅन्डच्या पण गाड्या आहेत. टाटाच्या पण गाड्या आहेत. तुम्ही ह्या तीनही गाड्याचे कोटेशन मागवून घ्या. तीन्ही गाड्यांचा परफॉमन्स मागवून घ्या त्याप्रमाणे तीन्ही उत्पादन कंपन्यांना बोलवून घ्या. चांगले जे वाटेल ते चूज करा. मॅन लिफ्टन जी कंपनी आहे ह्याच्यात दुसरी पण कंपनी आहे. त्याच्यात दुसरी पण कंपनी आहे. त्यांना पण बोलवा. जास्त वेळ वेस्ट करु नका. त्यानंतर डिसीजन द्या. आम्ही तुम्हाला परवानगी देतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. आयुक्तांना अधिकार द्या.

**मा. सभापती :-**

तुम्हाला अधिकार देतो.

**प्रकरण क्र. ०३ :-**

**उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरिता दोन Bharat Benz वाहनासह Meclifton Hydraulic Aerial Lift System खरेदी करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. ०३ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र . 1,2,3,4,5 व 6 अंतर्गत येणाऱ्या विभागात एकूण 71 उदयाने, 11 मैदाने, 14 स्मशाने, 2 चौपाटया व दुभाजके विकसित केलेली आहेत. तसेच मनपा रोडच्या दुतर्फा मोठया प्रमाणावर वृक्षारोपण केलेले असून सदर ठिकाणच्या धोकादायक फांदयांची छाटणी करणे, झाडांच्या फांदया इमारतीच्या खिडक्यांपर्यंत गेल्याने नागरिकांना त्रास होत असल्याची तक्रार आल्यास तातडीने छाटणी करणे . रोडच्या दुतर्फा असलेल्या स्ट्रीट लाईटच्या दिव्यांचा प्रकाश रस्त्यावर पडण्यास फांदयांपासून अडथळा होत असतो. त्यामुळे वेळोवेळी फांदयांची छाटणी करणे आवश्यक असते.**

**उपरोक्त नमुद सर्व बाबींचा विचार करुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 1,2,3,4,5 व 6 अंतर्गत येणाऱ्या उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरिता दि. 18/06/2005 व दि. 11/08/2011 रोजी हायड्रोलिक शिडीसह वाहन खरेदी करण्यात आलेली होती. सदरचे वाहन अनुक्रमे 13 वर्षे (बंद) व 07 वर्षे जुने झालेले असून वाहन वारंवार नादुरुस्त होत आहे . तसेच एका हायड्रोलिक शिडीच्यासहायाने छाटणी करण्यास खुप कालावधी लागत असल्याने मा. वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये व स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चेनुसार मा. उप-आयुक्त यांच्या पत्रान्वये मे. शालिमार इंजिनियरींग कंपनी यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा./539/2017-18 दि. 18/01/2018 रोजी व M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. यांना जा.क्र.मनपा/वृ.प्रा./550/2017-18, दि. 20/01/2018 अन्वये**

सदर उत्पादक कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात आली असता खालील प्रमाणे हायड्रोलिक शिडीसह वाहन खरेदी करणेकामी M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt . Ltd. यांचे अधिकृत विक्रेते M/s. Wasan Trucking Pvt. Ltd. यांचे दि. 16/02/2018 व मे. शालिमार इंजिनियरींग कंपनी यांचे दि. 20/02/2018 अन्वये शासकीय दरपत्रक प्राप्त झालेले आहेत . Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. (M/s. Wasan Trucking Pvt. Ltd.) व Shalimar Engineering Company या अनुक्रमे वाहन व Mac-lifton Hydraulic Aerial Lift System उत्पादक कंपन्या आहेत.

**A) Bharat Benz Vehicle**

| | Description | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|
| 1) | Model :- 1014R 4x2 3760 (17 Feet) E4 DYC CHS (Cabin Chassis) NT MD AW with PTO | 1 | 10,17,406 | 10,17,406 |
| | CGST @ 14% | | 1,42,437 | 1,42,437 |
| | SGST @ 14% | | 1,42,437 | 1,42,437 |
| | Insurance | | 50,000 | 50,000 |
| | RTO | | 30,000 | 30,000 |
| | TCS @ 1% | | 13,022 | 13,022 |
| | Net Amount Receivable | | | 13,95,302 |

**Bharat Benz Vehicle**

| | Description | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|
| 2) | Model :- 1014R 4x2 4250 (19 Feet) E4 DYC CHS (Cabin Chassis) NT MD AW with PTO | 1 | 10,23,161 | 10,23,161 |
| | CGST @ 14% | | 1,43,242.5 | 1,43,242.5 |
| | SGST @ 14% | | 1,43,242.5 | 1,43,242.5 |
| | Insurance | | 50,000 | 50,000 |
| | RTO | | 30,000 | 30,000 |
| | TCS @ 1% | | 13,096 | 13,096 |
| | Net Amount Receivable | | | 14,02,742 |

**B) SHALIMAR ENGINEERING COMPANY**
**MAC-LIFTON 13M 3B HYDRAULIC ARIEL LIFT**

| | Description | | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1) | Model | Maclifton 13M 3B | 1 | 18,12,444 | 18,12,444 |
| | Capacity | 225 kgs | | | |
| | Max. Working Height | 13 mtr From Ground Level | | | |
| | Max. Platform Height | 11.5 mtrs from ground level | | | |
| | Max. Outreach | 6.0 mtr | | | |
| | Overall Height | 3.5 mtr (Subject to truck model) | | | |
| | Overall Length | 7.3 mtr approx. (Subject to truck model) | | | |
| | Basket Size | 0.6 x 1.0 x 1.0 M | | | |
| | Working Pressure | 2200 PSI | | | |
| | Suitable Vehicle | 9 ton GVW. Wheel Base 3760 mm Fitted with PTO and PTO operating kit complete Preferably with power steering. | | | |
| | GST @ 18% | | | 3,26,240 | 3,26,240 |

| | | |
|---|---|---|
| | Net Amount Receivable | 21,38,684/- |

**MAC-LIFTON 14.5M 3B HYDRAULIC ARIEL LIFT**

| | Description | | Quantity | Unit Price | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 2) | Model | Maclifton 14.5M 3B | 1 | 19,75,444 | 19,75,444 |
| | Capacity | 225 kgs | | | |
| | Max. Working Height | 14.5 mtr From Ground Level | | | |
| | Max. Platform Height | 13.0 mtrs from ground level | | | |
| | Max. Outreach | 6.5 mtr | | | |
| | Overall Height | 3.5 mtr (Subject to truck model) | | | |
| | Overall Length | 7.3 mtr approx. (Subject to truck model) | | | |
| | Basket Size | 0.6 x 1.0 x 1.0 M | | | |
| | Working Pressure | 2200 PSI | | | |
| | Suitable Vehicle | Bharat Benz 914. Wheel Base 4200 mm Fitted with PTO and PTO operating kit complete Preferably with power steering. | | | |
| | GST @ 18% | | | 3,55,580 | 3,55,580 |
| | Net Amount Receivable | | | | 23,31,024/- |

**उपरोक्त प्रमाणे M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. (M/s. Wasan Trucking Pvt. Ltd.) या उत्पादक कंपनीकडून 02 वाहने (Bharat Benz Vehicle) खरेदी करणेकामी रु. 27,98,044/- (रु. सत्तावीस लाख अठ्याण्णव हजार चव्वेचाळीस मात्र) व M/s. Shalimar Engineering यांच्याकडून 02 वाहनांवर Maclifton Hydraulic Aerial Lift System बसविणेकामी रु. 44,69,708/- (रु. चव्वेचाळीस लाख एकोणसत्तर हजार सातशे आठ मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.**

**सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरिता "वाहन खरेदी / भाडे" या लेखाशिर्षाखाली रु. 100.00/- लाख (रु. एक कोटी मात्र) ची तरतुद करण्यात आलेली आहे. आप्तकालीन व्यवस्थापन तसेच मान्सूनपूर्व धोकादायक फांदयांची छाटणी करणेच्या अनुषंगाने वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.**

**उपरोक्त प्रमाणे M/s. Daimler India Commercial Vehicles Pvt. Ltd. (M/s. Wasan Trucking Pvt. Ltd.) या उत्पादक कंपनीकडून 02 वाहने (Bharat Benz Vehicle) व दोन्ही वाहनांवर M/s. Shalimar Engineering या उत्पादक कंपनीकडून Maclifton Aerial Lift System बसविणेकामी येणाऱ्या एकूण रु . 72,67,752/- (रु. बहात्तर लाख सदुसष्ट हजार सातशे बावन्न मात्र ) खर्चास तसेच सदरबाबत तातडीने देयक अदा करुन वाहने खरेदी करणेस मा . स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.**

सुचक :- श्री. प्रशांत दळवी    अनुमोदन :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ०४, **आगार व्यवस्थापक व ऑपरेशन मॅनेजर यांची नव्याने नवीकरण करणेबाबत.**

**प्रशांत दळवी :-**

देशपांडे मॅडम आगार व्यवस्थापन ऑपरेशन मॅनेजर ह्यांची नव्याने नविनीकरण करणेबाबत थोडेसे स्पष्टीकरण द्या.

**स्वाती देशपांडे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते आपण ६ महिन्यांच्या कालावधीसाठी आगार व्यवस्थापक आणि ऑपरेशन मॅनेजर ह्यांची नियुक्ती केली होती. हे बेस्टचे रिटायर्ड ऑफिसर होते. आणि परिवहनचे एक डेपो मॅनेजर म्हणून श्री. कलेत्रे ह्यांची नियुक्ती केली होती आणि ऑपरेशन मॅनेजर म्हणून श्री. कुलकर्णी ह्यांची नियुक्ती केली होती त्यांच्या एक्स्टेन्शनचा प्रस्ताव सादर केला.

**मा. सभापती :-**

ह्या दोघांच्यामुळे आपल्या पालिकेच्या परिवहन सेवेला काय फायदा झाला. आपल्या बसेस ऑन रोड वाढल्या की कमी झाल्या.

**प्रशांत दळवी :-**

ह्यांची ज्यावेळेला नियुक्ती केली त्यावेळेला आपल्याकडे किती बसेस चालू होत्या.

**स्वाती देशपांडे :-**

डेपो मॅनेजर आणि ऑपरेशन मॅनेजर ह्यांच्या नियुक्तीपूर्वी जवळपास १९-२० बसेस चालत होत्या. १९-२०-२१ ह्या दरम्यानच्या बसेस होत्या त्यानंतर डेपो मॅनेजर ह्यांचे काम आहे की रोजचे मेमो फाडणे आतापर्यंत हे काम आपला ठेकेदार करत होता. रोज किती बस येतात. प्रत्येक कामगारांना कोणत्या बसेसवर द्यायचे आहे.

**मा. सभापती :-**

मॅडम एक काम करा. पूढच्या मिटींगमध्ये ह्या दोन्ही अधिकाऱ्यांमुळे आपल्याला किती फायदा झाला ह्याच्यामध्ये आपण किती सुधारणा केल्या किती बसेस ऑन रुट आल्या ह्याची सर्व डिटेल द्या तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेऊ.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय मॅडम बोललेल्या की १२-१५ दिवसात ३-४ बस येणार होत्या रजिस्टर होऊन त्या आल्या का?

**स्वाती देशपांडे :-**

रजिस्ट्रेशन झाले आहे फक्त स्ट्रेज कॅरेजचे ९ हजार भरायचे आहे.

**दिप्ती भट :-**

किती टाईम लागेल.

**स्वाती देशपांडे :-**

२-४ दिवस लागतील.

**दिप्ती भट :-**

मॅडम ते कॉलेज चालू व्हायच्या अगोदर करा. मी तुम्हाला ट्रेनमधून कॉलेजला जाताना एवढ्या मुलांचे मयत झाले त्याची लिस्ट तुम्हाला आणून देते. दोन वर्षापासून पेंडींग आहे ह्या वर्षापासून कसे पण करुन करा.

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागात सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी परिवहन विभागाचे कामकाज संभाळणेकरीता कामाकाजातील ऑपरेशन मॅनेजर, डेपो मॅनेजर/डेपो सुप्रिटेंडेन्ट या दोन पदावर तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर मासिक रक्कम रू.४०,०००/- (चाळीस हजार मात्र) सहा अटीशर्तीवर दि. १९-०९-२०१७ रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यांकरीता सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आली होती.

या दोन्ही कर्मचऱ्यांच्या कामाचा आढावा घेवुन या दोन्ही कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीमुळे परिवहन सेवेच्या गुणवत्तेमधील फरक, परिवहन विभागास किती फायदा किंवा नुकसान झाले आहे, तसेच परिवहन सेवेत या दोन कर्मचाऱ्यांमुळे कोणकोणत्या सुधारणा झाल्या आहेत व भविष्यात होणार आहेत, याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा. तोपर्यंत सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

विषय मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०४ :-**

**आगार व्यवस्थापक व ऑपरेशन मॅनेजर यांची नव्याने नवीकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. ०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन विभागात सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी परिवहन विभागाचे कामकाज संभाळणेकरीता कामाकाजातील ऑपरेशन मॅनेजर, डेपो मॅनेजर/डेपो सुप्रिटेंडेन्ट या दोन पदावर तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर मासिक रक्कम रू.४०,०००/- (चाळीस हजार मात्र) सहा अटीशर्तीवर दि. १९-०९-२०१७ रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यांकरीता सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आली होती.

या दोन्ही कर्मच-यांच्या कामाचा आढावा घेवुन या दोन्ही कर्मचा-यांच्या कार्यपध्दतीमुळे परिवहन सेवेच्या गुणवत्तेमधील फरक, परिवहन विभागास किती फायदा किंवा नुकसान झाले आहे, तसेच परिवहन सेवेत या दोन कर्मचा-यांमुळे कोणकोणत्या सुधारणा झाल्या आहेत व भविष्यात होणार आहेत, याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा. तोपर्यंत सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, **श्री. बाबुराव वाघ, तत्कालीन उपकरनिर्धारक संकलक यांना लावण्यात आलेल्या शास्तीबाबतच्या अपिल अर्जावर विचार विनिमय करणेबाबत. (दि. ०३/०३/२०१८ प्रलंबित प्रकरण क्र. ९९)**

**प्रशांत दळवी :-**

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (१) नुसार दि.२२/०२/२०१६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्रभाग क्र.एफ, मालमत्ता क्र. F0४००३९५९०००० खोली सदनिका क्र.५.००२ A या मालमत्तेसाठी मालमत्ता कर बसविण्याकरिता महापालिकेस सादर केलेल्या कागदत्राच्या छायांकित प्रती माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२२/०२/२०१६ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न दिल्याने अपिलकर्ता यांनी दि.१३/०४/२०१६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०/०६/२०१६ आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखाचा शोध घेऊन मागितलेली माहिती अपिलार्थी यांना सात दिवसात विनामूल्य देण्याबाबत आदेश देऊन अपिल निकाली काढले आहे. त्यानंतर दि.०२/०७/२०१६ रोजी नस्तीचा शोध घेतला असता सापडली नसल्याचे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याचे नमूद करुन आयोगाकडे प्रस्तुत व्दितीय अपिल दि.३०/०७/२०१६ रोजी दाखल केले. अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर राहिल्याने त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत मा.राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ यांनी आदेश पारित केले आहेत.

त्या अनुषंगाने जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./८३८/२०१७-१८ दि.०४/०१/२०१८ अन्वये श्री.बाबुराव वाघ यांनी अपिलार्थी अर्जदार यांना अद्यापपर्यंत माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ (२) (अ) नुसार रु.५००/- दंडाची शास्ती लावण्यात आली आहे.

श्री.बाबुराव वाघ यांनी त्यांच्यावर लावण्यात आलेली शास्ती बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपिल दाखल केले आहे.

दि.२१/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये राज्य माहिती आयुक्त यांनी संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित राहिले बद्दल जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (क) नुसार कारवाई करावी असे आदेश पारित केले आहेत. राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ यांचे कडील व्दितीय अपिल दि.२१/०६/२०१७ रोजीच्या सुनावणीच्या कालावधील श्री.बाबुराव वाघ, अभिलेख कक्ष या विभागात कार्यरत होते.

श्री.बाबुराव वाघ, उप-कर निर्धारक व संकलक म्हणून वरिल कालावधील कार्यरत नसताना देखील प्रशासनाने त्यांचेवर दंडाची शास्ती बेकायदेशीर चूकीच्या माहितीच्या आधारे लावण्याचे आदेश पारित केले आहेत.

श्री.बाबुराव वाघ व्दितीय अपिलाचे सुनावणीचे वेळी अभिलेख कक्ष विभागात कार्यरत असल्याने तसेच सदर कालावधीत ते उप-कर निर्धारक व संकलक म्हणून कर विभागात कार्यरत नसताना देखील त्यांच्यावर चूकीच्या माहितीच्या आधारे लावण्यात आलेली असल्याने श्री.बाबुराव वाघ यांनी सदरबाबत मा. आयुक्त यांचेकडे अपिल सादर करणेस, ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्यावर प्रशासन आणि विधी विभागाचे काय मत आहे. मा. सभापती महोदय डिटेल्स आम्हाला आता प्राप्त झाले आहेत.

**सई वडके :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते ५६(४) नुसार बाबुराव वाघ ह्यांनी अपिल केलेले आहे. पण ५६(४) जर वाचला तर टर्मिनेशन आणि डिसमीसल आहे. त्या ऑर्डरच्या विरुध्द अपिल करण्याची तरतूद आहे. पण सर एम.सी.एस. रुल महाराष्ट्र सिव्हील सर्विस रुल प्रमाणे जर एखाद्या ऑथोरिटीने फाईन पॅनल्टी लेवी केली तर त्याच्या विरुध्द ॲम्लॅट ऑथोरीटी रिसेट करण्याचे अधिकार आहेत. कमिशनर साहेबांनी जर पॅनल्टी लावली असेल तर रिव्ह्यू ऑथोरिटी स्टॅन्डिंग कमिटी असू शकते. नजिकचे जे वरिष्ठ प्राधिकरण आहे हे अपिलिय अधिकारी असू शकते असे म्हटलेले आहे. आस्थापना विभाग एक लवकरच ऑर्डर काढणार आहे.

**मा. सभापती :-**

अपिल म्हणून आमच्याकडे दिले आम्ही तो निर्णय घेतला. ॲजपर लॉ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम जो आहे १९४९ चे कलम ५६(४) अन्वये................

**सई वडके :-**

साहेब मॅडमनी मला आता सांगितले ही ऑर्डर उपायुक्त साहेबांनी केलेली आहे. ह्याचे नजीकचे उपायुक्त साहेबांचे ॲम्लॅट ऑथोरिटी जे आहे ते कमिशनर साहेब आहेत अपिल तिथे बनवणार.

**जुबेर इनामदार :-**

आमच्याकडे नाही आले पाहिजे.

**सई वडके :-**

नाही.

**मा. सभापती :-**

आयुक्तांकडे अपिल केले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय गोषवारा आज प्राप्त झाला आहे. अभ्यास करणे गरजेचे आहे.

**मा. सभापती :-**

हा गोषवारा नाही.

**जुबेर इनामदार :-**

प्रकरणाची माहिती.

**मा. सभापती :-**

अर्जदारांनी अर्ज दिला होता. त्याअनुषंगाने आपण तो स्थायीला अधिकार आहे म्हणून ५६(४) नुसार घेतला होता.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती बाबुराव वाघ हे पालिकेचे जुने कर्मचारी आहेत. अन्याय झाला नाही पाहिजे. ह्या मताशी मी ही आहे. मात्र आपल्याला कुठलेही पाऊल उचलताना स्पष्ट अभिप्राय विधी मॅडमचा सभागृहामध्ये असताना

की अपिलीय अधिकारी सध्या आयुक्त आहेत. आयुक्तांना आपला अभिप्राय स्पष्ट करु द्या. त्यानंतर स्थायी समिती समोर येऊ द्या. गोषवाऱ्यासहित येऊ द्या. त्यानंतर जो काही निर्णय घ्यायचा तो घेऊ.

**मा. सभापती :-**

जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित असल्याचे त्याच्या विरोधात कारवाई करणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी कोण होते आणि जनमाहिती अधिकारी कोण होते.

**स्वाती देशपांडे :-**

जेव्हा कोकण भवनला अपिल होते तेव्हा जनमाहिती अधिकारी विजय पाटील आणि अपिलीय अधिकारी म्हसाळ सर होते. परंतु ही शास्ती अनुपस्थित असल्यामुळे लावली नाही. कोकण भवन मा. आयुक्त ह्यांचा निर्णय झाला होता की त्यांना १५ दिवसात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्या अनुषंगाने पूढचे जे उपकर निर्धारक आहेत जनमाहिती अधिकारी होते त्यांना आपण आदेशित केले होते की सदर माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

**मा. सभापती :-**

मॅडम आपण आदेश वाचले आहेत का? आदेशामध्ये म्हटले आहे पाचवी लाईन बघा असे असता देखील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्याच्या विरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका ह्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८) क नुसार असे आदेश देण्यांत येत आहेत की ह्या प्रकरणी कोणतीही पुर्व सुचना न देता अनुपस्थित राहिले असल्याने जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी ह्यांच्या विरुध्द वरील पत्रकानुसार नियमानुसार कारवाई करण्यात यावी. मात्र ह्याच्या विरुध्द काय कारवाई केली. आदेश पारित केला.

**सुरेश खंडेलवाल :-**

आदेशमध्ये अनुपस्थितीचे कारण दिले आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो त्याचे अपिल झालेले होते. माहिती अधिकारी अर्जदाराने माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागितली आणि विहीत मुदतीत दिली नाही. दरम्यानच्या काळामध्ये आपल्याकडे इलेक्शन प्रोसिजर चालू होती. निवडणूक प्रक्रिया चालू असल्यामुळे दर रोजचा दिवस आपल्याकडे महत्वाचा होता. त्या काळामध्ये अपिल झाले होते त्यांनी आपल्याला कळवले नव्हते. आपल्याला ती पोहोच झाली नव्हती की ह्या तारखेला अपिल आहे. त्यानंतर त्यांनी निर्णय दिला निर्णयाची प्रत आल्यानंतर आपण ह्यांना म्हटले की तुम्ही दरम्यानच्या काळात विजय पाटील रिटायर्ड झाले होते आणि बाबुराव वाघ ह्यांना उप करनिर्धाकरचा चार्ज दिला होता. त्याची काही वेगळी माहिती अधिकारी म्हणून ऑर्डर आपण काढत नाही. ज्या पदावर आहे त्यांना माहिती द्यावी लागते. माझी अपिलीय अधिकारी म्हणून ऑर्डर काढलेली नाही. त्या पदावर आहे म्हणून.

**मा. सभापती :-**

जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे तुम्ही आणि विजय पाटील होते. बाबुराव वाघ नव्हते म्हणजे त्यांचा काही संबंध नाही. बाबुराव वाघचे एक पत्र आहे. मी बाबुराव वाघ अभिलेख कक्ष येथे कार्यरत असून उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये मला उपकर निर्धारक व संकलक या रिक्त पदाचा अतिरिक्त पदभार आज दि. ०४/०७/२०१७ पासून स्विकारत आहे. आणि ही २१/०६ ची ऑर्डर आहे. म्हणजे ह्याचा अर्थ बाबुराव वाघचा काही संबंध नसताना त्यांच्यावर शास्ती लावण्यांत आली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

४/०७ ला हे झाले आणि त्याच्या आधी आपण १०/०६ ला अपिल घेतले आहे. पहिले अपिल माझ्याकडे झाले होते. १०/०६ च्या अपिलामध्ये जे काही माहिती अधिकारी होते त्याच्यानंतर महिनाभराने बाबुराव वाघ आले.

**मा. सभापती :-**

तुम्ही १० जूनला ऑर्डर काय दिली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

१० जूनला ७ दिवसांमध्ये द्यावे.

**मा. सभापती :-**

त्यावेळी ऑफिसर कोण होते.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

विजय पाटील होते.

**मा. सभापती :-**

त्यांचे काम होते विद इन ७ डेज त्यांनी दिले पाहिजे. त्यांनी दिले नाही. ४/०७ च्या दरम्यान बाबुराव वाघनी चार्ज घेतला. मग एक्स.वाय.झेड अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे किंवा निष्काळजीपणामुळे किंवा इलेक्शनमध्ये बिझी असल्यामुळे त्या माणसाने उत्तर दिले नाही. मग बाबुराव वाघनी चार्ज घेतल्यानंतर.............

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

बाबुराव वाघ ह्यांनी माहितीच्या अधिकाराखाली शास्ती नाही. बाबुराव वाघ ह्यांनी जेव्हा चार्ज घेतला त्याच्यानंतर ६ महिने मधे गेले त्याच्यानंतर बाबुराव वाघना प्रत्येक वेळेस यायचे द्वितीय अपिल झाल्यानंतर अर्जदार ऑर्डर कॉपी घेऊन यायचे त्यावेळेस बाबुराव वाघ ह्यांच्याकडे अभिलेख आणि करनिर्धारक हे दोन्ही चार्ज होते. जरी फाईल त्यांच्याकडे असेल किंवा उपकर निर्धारककडे असेल तरी दोन्ही चार्ज होल्ड करत होते. आपण ही शास्ती लावलेली ही माहिती अधिकार प्रथम अपिल अधिकारी म्हणून शास्ती लावली नाही. प्रथम अपिल अधिका-यांना शास्ती लावण्याचे अधिकार नाहीत. चार्ज घेतल्यानंतर ६ महिने माहिती दिली नाही. विजय पाटीलचा रोल संपला. विजय पाटील गेल्यानंतर जेव्हा ह्यांच्याकडे चार्ज होता त्यावेळेस आपण ह्यांना वेळोवेळी जेव्हा अर्जदार आपल्याकडे माहितीला यायचे तक्रार घेऊन यायचे की द्वितीय माहिती अधिकारामध्ये १५ दिवसात माहिती द्या म्हणून सांगितले आहे तर तुम्ही ही माहिती द्या जो कोण तत्कालीन माहिती अधिकारी असेल त्याला आपण सांगणार.

**मा. सभापती :-**

राज्य माहिती आयुक्त कोकण खंडपीठ ह्यांची पण एक पोस्ट आहे. त्यांनी तुम्हाला आदेश दिले की जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे त्याच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. कारवाई करण्यांत यावी. कोकण माहिती आयुक्त खंडपिठाने जो आदेश दिला आहे त्याच्यावर प्रशासनाने काय कारवाई केली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यायला सांगितली.

**मा. सभापती :-**

त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

नियमानुसार काय कारवाई केली हे सांगा कोकण खंडपिठाने आदेश देऊन सुध्दा जर आयुक्तांनी कारवाई केली नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्याच्यानंतर आयुक्तांनी बोलावून सांगितले होते. तुम्हा दोघांना माहिती देणे क्रमप्राप्त आहे. त्यांना माहिती द्या. गिते साहेबांनी सांगितले.

**मा. सभापती :-**

कुठे आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

हे तोंडी झालेले आहे.

**मा. सभापती :-**

राज्य माहिती आयोगानी ऑर्डर केली आहे की ह्याच्यावर नियमानुसार कारवाई करा. ह्याला थोडी ना कारवाई म्हणतात.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपण समोर बोलवून सुचना दिल्या म्हणजे हा सुध्दा कारवाईचाच भाग झाला.

**मा. सभापती :-**

सुचना देणे आणि कारवाई करणे वेगळे आहे.

**प्रशांत दळवी :-**

म्हसाळ साहेब आपण जे बोलता विधी मॅडम हा जो विषय आहे द्वितीय अपिल आले आहे. ते आपण कमिशनरकडे ऑथोरीटी आहे. मग ह्यांना जी ५०० रुपयांची शास्ती लागली ही कमिशनरची ऑर्डर होती का?

**सुरेश खंडेलवाल :-**

उप-आयुक्तांनी लावली ना.

**प्रशांत दळवी :-**

उप-आयुक्त लावू शकतात का? अपिल आयुक्तांकडे गेले पाहिजे. आयुक्तांचा रिमार्क असला पाहिजे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

माहिती अधिकारात आयुक्त नाहीत. मी आहे.

**सई वडके :-**

अधिकारी दोषी आहे त्याच्यावर तुम्ही शिस्तभंगाची कायदेशीर कारवाई प्रस्तावित करा. त्या अनुषंगाने उपायुक्त मुख्यालयानी त्याच्यावरती शिस्तभंगाची कायदेशीर कारवाई प्रस्तावित केली आणि त्यांना ५०० रुपयांचा दंड लावला. उपायुक्त मुख्यालयाचे जे नजिकचे वरिष्ठ अधिकारी आहेत ते कमिशनर आहेत. मग ते अपिल त्याच्याकडे दाखल झाले पाहिजे आणि आयुक्तांचे नजिकचे वरिष्ठ प्राधिकरण म्हणजे स्टॅन्डिंग कमिटी आहे. आयुक्तांच्या निर्णयाच्या विरुध्द अपिल इथे होणार आणि उपायुक्त मुख्यालयचे आयुक्तांकडे होणार.

**मा. सभापती :-**

राज्य माहिती कोकण खंडपीठ ह्यांनी जो आदेश दिला आहे त्याची व्हॅलिडीटी काय?

**सई वडके :-**

प्राधिकरण सेकन्ड ऑथोरिटी माहिती अधिकारा अंतर्गत आहे ते आपल्याला दंड शिस्तभंगाचा लावत लावत नाही डिसीप्लीनरी ॲक्शन घ्यायला.

**मा. सभापती :-**

ह्या आदेशाचे व्हॅलीडीटी काय?

**सई वडके :-**

व्हॅलिडीटी आहे.

**मा. सभापती :-**

ह्यांनी क्लीअर दिले आहे की जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी ह्यांच्या विरुध्द वरील नियमानुसार कारवाई करण्यात यावी. ती कारवाई काही असेल ती कारवाई करणे क्रमप्राप्त आहे की नाही.

**सई वडके :-**

सर केली ना.

**मा. सभापती :-**

काय केली.

**सई वडके :-**

५०० रुपये दंड लावला ना.

**मा. सभापती :-**

मग प्रथम अपिलीय अधिकारी ह्यांच्यावर काय केली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

प्रथम अपिलिय अधिकारी ह्यांनी अपिल केले होते ना. अपिलात माहिती द्यायला लावली ना.

**मा. सभापती :-**

५०० रुपये नंतर लावले. का लावले की बाबुराव वाघ ह्यांनी ६ महिन्यात त्यांना उत्तर दिले नाही म्हणून ५०० रुपये दंड लावला.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

माहिती दिली नाही.

**मा. सभापती :-**

चाप्टर क्लोज झाला. तुम्ही आम्हाला सांगितले की उपायुक्तांनी ऑर्डर केलेली आहे की ५०० रुपये दंड भरा. बाबुराव वाघ ह्यांचे काम होते की आयुक्तांकडे अपिल करावे तो विषय संपला. कोकण आयुक्तांनी ऑर्डर केली आहे की जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्या

विरोधात कारवाई करणे आवश्यक आहे. पुन्हा खाली म्हटले की नियमानुसार कारवाई करण्यात यावी. ह्या आदेशानुसार कारवाई करणे अपेक्षित होते.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. सभापती साहेब ह्यांच्यामध्ये टाईम पिरेड आहे. कारवाई करायची आहे पण किती करायची, किती दिवसामध्ये करायची.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

लोअर कोर्टनी ऑर्डर पास केली की मग सिनिअर डिव्हीन लोअर कोर्टला बोलवत नाहीत.

**मा. सभापती :-**

आयुक्त ह्याच्यापेक्षा वरती आहेत असे तुमचे म्हणणे आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आयुक्तांचा प्रश्न नाही.

**मा. सभापती :-**

राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठ ह्यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेल्या द्वितीय अपिलाची जी ऑर्डर आहे ह्यांनी आदेश कोणाला दिला ह्यांनी आदेश आयक्तांना दिला की नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मग आयुक्तांनी ह्या बाबतीत मला बोलावले ते म्हणाले तुम्ही का गेले नाहीत. साहेबांना आपण निवडणूकीचा पूर्ण प्रोग्राम दाखवला म्हटले हे सर्व केले ह्यामध्ये अपिल ऑर्डरमध्ये निर्णय दिलेला आहे. म्हणजे अपिल अधिकाऱ्यांचे म्हणणे काय आहे अपिल अधिकाऱ्यांचा रोल काय आहे की अर्जदाराला जास्तीत जास्त माहिती पूरवणे. आणि त्या पध्दतीने मी अपिल करुन अपिल घेतले नसते अपिलार्थी निर्णय दिला नसता तर अपिलीय अधिकारी त्याच्यामध्ये दोषी दिसून येतो. परंतु त्याच्यामध्ये अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांचा रोल व्यवस्थित केलेला आहे. हे आयुक्तांच्या निदर्शनास आणले होते. निवडणूक प्रोसीजरमुळे ते उपस्थित राहू शकले नव्हते. आता आपल्याकडे जे काही बरेच अपिल होतात............

**मा. सभापती :-**

ज्याप्रमाणे आदेश येतो त्या आदेशाचे पालन करणे आयुक्तांचे काम असते. हे रायटींगमध्ये आहे. त्याचप्रमाणे रायटिंगमध्ये त्यांना कारवाई करणे म्हसाळ साहेब आपण जी चुक केलेली आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मला त्यांनी खुलासा विचारला.

**मा. सभापती :-**

ओरली नाही रायटिंगमध्ये आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मी त्यांना दाखवले.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये अशी सुधारणा करा की बाबुराव वाघ ह्यांनी आयुक्तांकडे अपिल करावे. त्यानंतर स्थायी समिती विचार करेल.

**प्रकरण क्र. ०५ :-**

**श्री. बाबुराव वाघ, तत्कालीन उपकरनिर्धारक संकलक यांना लावण्यात आलेल्या शास्तीबाबतच्या अपिल अर्जावर विचार विनिमय करणेबाबत. (दि. ०३/०३/२०१८ प्रलंबित प्रकरण क्र. ९९)**

**ठराव क्र. ०५ :-**

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (१) नुसार दि.२२/०२/२०१६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्रभाग क्र.एफ, मालमत्ता क्र. F0४००३९५९०००० खोली सदनिका क्र.५.००२ A या मालमत्तेसाठी मालमत्ता कर बसविण्याकरिता महापालिकेस सादर केलेल्या कागदत्राच्या छायांकित प्रती माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२२/०२/२०१६ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न दिल्याने अपिलकर्ता यांनी दि.१३/०४/२०१६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०/०६/२०१६ आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखाचा शोध घेऊन

मागितलेली माहिती अपिलार्थी यांना सात दिवसात विनामूल्य देण्याबाबत आदेश देऊन अपिल निकाली काढले आहे. त्यानंतर दि.०२/०७/२०१६ रोजी नस्तीचा शोध घेतला असता सापडली नसल्याचे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याचे नमूद करुन आयोगाकडे प्रस्तुत व्दितीय अपिल दि.३०/०७/२०१६ रोजी दाखल केले. अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर राहिल्याने त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत मा.राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ यांनी आदेश पारित केले आहेत.

त्या अनुषंगाने जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./८३८/२०१७-१८ दि.०४/०१/२०१८ अन्वये श्री.बाबुराव वाघ यांनी अपिलार्थी अर्जदार यांना अद्यापपर्यंत माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ (२) (अ) नुसार रु.५००/- दंडाची शास्ती लावण्यात आली आहे.

श्री.बाबुराव वाघ यांनी त्यांच्यावर लावण्यात आलेली शास्ती बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपिल दाखल केले आहे.

दि.२१/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये राज्य माहिती आयुक्त यांनी संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित राहिले बद्दल जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (क) नुसार कारवाई करावी असे आदेश पारित केले आहेत. राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ यांचे कडील व्दितीय अपिल दि.२१/०६/२०१७ रोजीच्या सुनावणीच्या कालावधील श्री.बाबुराव वाघ, अभिलेख कक्ष या विभागात कार्यरत होते.

श्री.बाबुराव वाघ, उप-कर निर्धारक व संकलक म्हणून वरिल कालावधील कार्यरत नसताना देखील प्रशासनाने त्यांचेवर दंडाची शास्ती बेकायदेशीर चूकीच्या माहितीच्या आधारे लावण्याचे आदेश पारित केले आहेत.

श्री.बाबुराव वाघ व्दितीय अपिलाचे सुनावणीचे वेळी अभिलेख कक्ष विभागात कार्यरत असल्याने तसेच सदर कालावधीत ते उप-कर निर्धारक व संकलक म्हणून कर विभागात कार्यरत नसताना देखील त्यांच्यावर चूकीच्या माहितीच्या आधारे लावण्यात आलेली असल्याने श्री.बाबुराव वाघ यांनी सदरबाबत मा. आयुक्त यांचेकडे अपिल सादर करणेस, ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०६, **विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत . (पाणी पुरवठा विभाग) (दि. २३/०३/२०१८ प्रलंबित प्रकरण क्र. १३०)**

**जुबेर इनामदार :-**

भुयारी गटार पहिल्या टप्प्याचा अजून ठिकाणा नाही. त्याच्याकडून माहिती घ्या. दुस-याचा डी.एस.आर तयार करुन पुन्हा सल्लागार नेमायचे चालले आहे. आमचा विरोध आहे. आज १८ वर्ष झाली भुयारी गटार कार्यरत झाले नाही. त्याचा काही ठाव ठिकाणा नाही. आणि नविन करायला निघाले.

**मा. सभापती :-**

विषय असा आहे वाकोडे साहेब नाहीत. मी दोघांना बोलावले होते त्यांनी व्यवस्थित माहिती दिली हे आपण उर्वरीत ह्याच्यासाठी केले आहे. एक्झीस्टींगवर नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आमचा एक्झीस्टिंगवरच विषय चालला आहे. आपण जो सुरुवातीला एक्झीस्टींग केला ना तो २००८ ला कार्यरत झाला पाहिजे. २०१८ चलू आहे. १० वर्ष पूर्ण झाली तरी योजना आपण राबवू शकलो नाही. एवढी वाईट परिस्थिती आहे आता दुसरे करायला निघालात म्हणजे असे व्हायला नको डी.पी.आर तयार झाला..........

**शरद नानेगावकर :-**

मागचा जो डी.पी.आर आहे लोकसंख्या वाढलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला माहिती आहे तुम्ही कसला डी.पी.आर काढायला निघालात ते........

**मा. सभापती :-**

त्यांना जुन्या डी.पी.आर बद्दल सांगा. जुन्या भुयारी गटार योजनेची सद्यस्थिती काय आहे आणि अजून किती काम प्रलंबित आहे कधीपर्यंत होणार ते सांगा.

**जुबेर इनामदार :-**

